## परभणी जिल्हयासाठी खालील योजने अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने जिल्हा सेतु समितीमार्फत पदभरती करणे बाबत.

जा.क्र.२०१६/जिनिक/मग्रारोहयो/सिआर
जिल्हाधिकारी कार्यालय परभणी
दिनांकः- 2९/११/२०१६

<u>जाहिरात</u>

परभणी जिल्ह्यासाठी खालील योजने अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने जिल्हा सेतु समितीमार्फत पदभरती करणेसाठी पदांची संख्या, पदांची पात्रता व मानधन यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

| अ.क्र | योजनेचे नांवे | पदांची नांवे | अपेक्षित पदांची पात्रता | पद संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | पॅनल तांत्रिक अधिकारी (TSP) | १ सिव्हील इंजिनिअरींग पदविका धारक (~~किमान~~)<br>२ कृषी विद्यापीठाचा कृषि अभियांत्रिकी पदवीधारक<br>३ कृषि विद्यापीठाचा कृषि पदवीधारक<br>४ वनक्षेत्रातील पदवीधारक (वनक्षेत्रातील पदवीधारक उपलब्ध न झाल्यास कृषि पदवीधारक घ्यावेत. | ०७ | १४०००/- |
| | | सहायक कार्यक्रम अधिकारी (APO) | MBA, MSW किंवा पदव्युत्तर पदविधार (Post Graduate) | ०६ | ११०००/- |
| ०२ | जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत | संगणक चालक | १२ वी पास + MS-CIT + typping 30 Mar & 40 Eng | १० | ५०००/- |
| ०३ | बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती कार्यालयासाठी | संगणक चालक | १२ वी पास + MS-CIT + typping 30 Mar & 40 Eng | ११ | ५०००/- |

| कार्यवाहीचा तपशिल | दिनांक | योजने चे नाव | अर्ज स्विकाणाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| जाहिरात प्रसिध्दी (वर्तमानपत्र व वेबसाईट) | दि. ०२/१२/२०१६ | | |
| जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांचे अर्ज स्विकारणे | दि. ०२/१२/२०१६ ते ०९/१२/२०१६ वेळः स.११.०० सायं ५.०० वा. पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | **रोहयो विभाग , जि.अ.का. परभणी** |
| | | **जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत** | **जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, परभणी** |
| | | **बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती कार्यालयासाठी** | **जिल्हा बाल संरक्षण कक्ष परभणी तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, कल्याण नगर भारत गॅस एजन्सी जवळ हनुमान मंदिर मागे वसमत रोड परभणी.** |
| जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या प्राप्त अर्जांची छाननी | १३/१२/२०१६ | | |
| पात्र / अपात्र यादी प्रसिध्द करणे | १५/१२/२०१६ . | | |
| तोंडी मुलाखतीचा दिनांक पात्र / अपात्र यादीसोबत परभणी जिल्हयाचे संकेतस्थळ www.parbhani.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. | | | |

## परभणी जिल्ह्यासाठी खालील योजने अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने जिल्हा सेतु समितीमार्फत पदभरती करणे बाबत.

<u>अटी व शर्ती:-</u>

१. अर्जाचा नमुना, तोंडी मुलाखत व निकालासंबंधी दिनांकनिहाय कार्यक्रम पत्रिका या कार्यालयाची वेबसाईट **<u>www.parbhani.nic.in</u>** वर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२. उमेदवारांची किमान वयोमर्यादा १८ वर्षापेक्षा कमी नसावी.

३. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या व अनुभवाच्या सत्यप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे व प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी मुळ प्रत तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

४. सदरची नेमणुक ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाच्या असुन शासन निर्णयानुसार **प्रथम नियुक्ती ही ०६ (सहा)** महिण्याच्या कालावधीपर्यंत असेल. त्यामुळे सेवा नियमित करण्याची कोणतीही मागणी करता येणार नाही किंवा ते अनुज्ञेय राहणार नाही.

५. सदरील तांत्रिक अधिका-यास शासन निर्णय दिनांक ७ मार्च २०१५ मध्ये क्र ०५ नुमार नमुद केल्याप्रमाणे प्रचलित दराप्रमाणे मानधन देण्यात येईल.

६. निवड झालेल्या उमेदवारांस रु 100/- च्या स्टँपपेपरवर (बाँडवर) सेवेबाबत करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

७. नियुक्त उमेदवारांकडुन आर्थिक किंवा ईतर नुकसान झाल्यास ते संबधिताकडुन वसुल करण्यात येईल व गुन्हयाचे स्वरुप पाहून वेळेनुसार नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

८. नियुक्त उमेदवारांस पुर्णवेळ काम करणे बंधनकारक आहे, काम करतांना कुठल्याही प्रकारचा अनपेक्षित घटना / अपघात इ. कारणामुळे शारिरीक इजा झाल्यास त्यास तो स्वतः जबाबदार राहील. त्याबाबत कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही. किंवा हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

९. नियुक्त उमेदवारांस स्वतःचे इच्छेनुसार सेवामुक्त / राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी **०१ (एक)** महिना अगोदर या कार्यालयास कळविणे बंधनकारक आहे. अशी नोटीस न दिल्यास व सेवा सोडुन गेल्यास एक महिण्याचे मानधन वसुल करण्यात येईल. परंतु संबधिताना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता काढुन टाकण्याचा किंवा सेवा कालावधी कमी करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

१०. **अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक ०९/१२/२०१६ असुन जाहिरातीपुर्वी व मुलाखतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

११. सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे अर्ज **ए-4** साईजवर संगणकीकृत करुन सादर करावा. व अर्जावर स्वतःचा सद्काळातला फोटो लावावा.

१२. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारास मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. अपात्र ठरलेल्या उमेदवारांस कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा कारण कळविले जाणार नाही, किंवा कोणतीही सबब ऐकुण घेतली जाणार नाही.

१३. जर मोठया प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास वेळ प्रसंगी लेखी परिक्षा, पदानुसार संगणकीय परिक्षा व मुलाखत घेतली जाईल. याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरितांकडे आहे.

१४. उपरोक्त मानधना व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते, सवलती अनुज्ञेय असणार नाहीत.

१५. **अर्जासोबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु समिती यांचे नांवे रु. 100/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) नापरतावा म्हणुन जोडणे बंधनकारक आहे.**

१६. उमेदवारांचे कार्यक्षेत्र हे परभणी जिल्हा असुन जिल्हयातील तालुक्याचे ठिकाणी त्यांना काम करावे लागेल. कर्तव्यक्षेत्र या कार्यालयामार्फत नेमुण देण्यात येईल त्यामाठी उमेदवारांची

पसंती विचारात घेतली जाणार नाही. परंतु नेमुण दिलेले कर्तव्यस्थान बदलण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरितांना आहे.

१७. **तोंडी मुलाखतीच्या तारखेस येतेवेळेस आपले मुळ कागदपत्रासह ०१ तास अगोदर मिटींग हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे उपस्थित राहावे.**

१८. सदर पद भरती प्रक्रियेमध्ये सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१९. निकालासंबधी या कार्यालयाची वेबसाईट www.parbhani.nic.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल. **निकालासंबंधी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष जिल्हा सेतु समिती
परभणी.

# अर्जाचा नमुना

उमेदवाराचा
मध्यकाळातला
फोटो चिकटवावा

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती,
परभणी.

**पदाचे नाव----------------------------------------------**

**(लागु नसेल ते खोडावे)**

01. उमेदवाराचे संपुर्ण नांव:--------------------------------------------------------------------------------
**(आडनांव प्रथम लिहावे)**
02. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता: -------------------------------------------------------------------------
03. भ्रमणध्वनी /दुरध्वनी क्रमांक -----------------------------------------------------------------------
04. ई-मेल आयडी ---------------------------------------------------------------------------
05. जन्म तारिख (शालांत टि. सी. नुसार) वय वर्ष---------------------------------------------------------
06. शैक्षणिक पात्रता

| अ.क्र | परिक्षेचे नांव | उतीर्ण वर्ष | मंडळ / विद्यापीठाचे नांव | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 01 | | | | |
| 02 | | | | |
| 03 | | | | |
| 04 | | | | |
| 05 | | | | |

अनुभवाचा तपशिल

| अ.क्र | संस्था कार्यालयाचे नांव | पदनाम | वेतनश्रेणी/मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 01 | | | | |
| 02 | | | | |
| 03 | | | | |
| 04 | | | | |
| 05 | | | | |

टिप: अर्जासोबत अनुभवाचे प्रमाणपत्र साक्षांकित करुन जोडावे.

07. अर्जासोबत सादर केलेल्या प्रती 01.
02.
03.

मी खालील सही करणार प्रमाणित करतो की, उपरोक्त माहिती ही खरी असुन ती चुकीची आढळून आल्यास मी कायदेशिर कार्यवाहीस पात्र ठरेल. माझा अर्ज अवैद्य ठरल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही अथवा न्यायालयाचा मार्ग अवलंबणार नाही.

स्थळ:
दिनांक:

(अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी)

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय परभणी.

## शुध्दीपत्रक

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा सेतू समिती विभागामार्फत जाहिरात जा.क्र.२०१६/जिनिक/मग्रारोहयो/सिआर- दिनांक- २९/११/२०१६ अन्वये जिल्हा बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती कार्यालय परभणीसाठी एकूण ११ संगणक चालक पदाच्या तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने जिल्हा सेतू समितीमार्फत थेट मुलाखतीव्दारे निवड करण्याबाबतची जाहिरात देण्यात आलेली होती. तथापी उक्त कार्यालयासाठी एकूण ११ संगणक चालक पदाची भरती प्रक्रिया प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

दिनांक :- 2/12/2016

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा सेतू समिती परभणी.